कृषि विभागाची 'क्षमता विकास योजना' (Capacity Building Plan - CBP) तयार प्रशासकीय विभाग स्तरावरील Capacity Building Unit (Dept-CBU) गठीत करण्याबाबत..

# महाराष्ट्र शासन

## कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण -२०२६/प्र. क्र.५०/३-अे**

**हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,**

**मंत्रालय, मुंबई - ४०००३२.**

**दिनांक : १८ मे, २०२६.**

**संदर्भ**:-१) सदस्य, क्षमता विकास आयोग, भारत सरकार यांचे पत्र क्र.D.O. NO. 346/Member (Admn.)/CBC-2026, दिनांक ०६ मार्च, २०२६ रोजीचे पत्र

२) उप सचिव (प्रशि-५), सामान्य प्रशासन विभाग यांचे पत्र क्र.संकीर्ण-२०२६/प्र.क्र.०७/प्रशि-५, दिनांक १६.०४.२०२६

**<u>प्रस्तावना</u> :-**

राज्य शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कौशल्यात वाढ करून त्यांना 'विकसित महाराष्ट्र' मोहिमेसाठी सक्षम करणे हे शासनाचे ध्येय आहे. केंद्र शासनाच्या क्षमता विकास आयोगाच्या (CBC) संदर्भ क्र.१ च्या पत्रान्वये प्रत्येक विभागाने आपली स्वतंत्र 'क्षमता विकास योजना' (Capacity Building Plan - CBP) तयार करण्याच्या सूचना दिल्या आहेत. केंद्र शासनाच्या सूचनेनुसार महाराष्ट्र राज्यातील सर्व शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कौशल्यात वृद्धी करण्यासाठी प्रत्येक विभागाने संवर्ग निहाय आपली स्वतंत्र 'क्षमता विकास योजना' (Capacity Building Plan) तयार करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने प्रत्येक प्रशासकीय विभागाने 'क्षमता विकास योजना' (Capacity Building Plan - CBP) तयार प्रशासकीय विभाग स्तरावरील Capacity Building Unit (Dept-CBU) गठीत करण्याबाबत संदर्भ क्र.२ च्या पत्रान्वये सामान्य प्रशासन विभागाने सूचना दिल्या आहेत. त्यानुसार कृषि विभागाची 'क्षमता विकास योजना' (Capacity Building Plan - CBP) तयार प्रशासकीय विभाग स्तरावरील Capacity Building Unit (Dept-CBU) गठीत करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## <u>शासन निर्णय:-</u>

कृषि विभागाची 'क्षमता विकास योजना' (Capacity Building Plan - CBP) तयार खालीलप्रमाणे प्रशासकीय विभाग स्तरावरील Capacity Building Unit (Dept-CBU) गठीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे:-

| | | |
|---|---|---|
| १ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग मंत्रालय, मुंबई | अध्यक्ष |
| २ | आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य |
| ३ | संचालक, वनामती, नागपूर | सदस्य |
| ४ | उप सचिव (३अे), कृषि व पदुम विभाग मंत्रालय, मुंबई | सदस्य सचिव |
| ५ | कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, पुणे | सदस्य |
| ६ | कृषि संचालक (आत्मा), कृषि आयुक्तालय, पुणे | सदस्य |
| ७ | कृषि सहसंचालक (आस्थापना), कृषि आयुक्तालय, पुणे | सदस्य |

२. Capacity Building Unit (Dept-CBU) ची कार्यकक्षा :-

अ) Capacity Building Unit (CBU) विभागातील कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाशी संबंधित गरजांचे विश्लेषण करेल आणि क्षमता विकास योजना (Capacity Building Plan) राबविण्यासाठी 'नोडल संस्था' (Nodal Body) म्हणून काम करेल.

आ) विभागातील विविध संवर्गातील पदांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या विचारात घेवून त्यांच्यासाठी आवश्यक असलेल्या कौशल्यांवर आधारीत क्षमता विकास आराखडा तयार करणे. हा आराखडा तयार करताना चालू आर्थिक वर्षातील उद्दिष्टे आणि भविष्यातील गरजा यांचा विचार करावा. तसेच यासाठी 'IGOT-कर्मयोगी' या व्यासपीठावर उपलब्ध असलेल्या AI आधारित साधनांचा वापर करावा.

इ) विभागांनी केवळ पारंपारिक प्रशिक्षणावर अवलंबून न राहता, ऑनलाईन प्रशिक्षण आणि प्रत्यक्ष प्रशिक्षण (In-person आणि On-the-job training) अशा संमिश्र प्रशिक्षण पद्धतीचा अवलंब करावा. राज्याने ठरवून दिलेल्या उद्दिष्टानुसार विभागाच्या क्षमता बांधणी आराखड्याची निर्मिती व अंमलबजावणी करणे, नियतकालिक आढावा घेणे.

ई) 'IGOT कर्मयोगी' या पोर्टलवर विभागातील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांची नोंदणी (Onboarding) आणि प्रशिक्षणाचे पर्यवेक्षण करणे, तसेच ऑनलाइन अभ्यासक्रम वेळेवर पूर्ण होतील आणि ऑफलाइन कार्यशाळा/प्रशिक्षणांमध्ये कर्मचाऱ्यांचा सहभाग असेल, याची खातरजमा करणे.

उ) सर्व प्रकारच्या प्रशिक्षणासाठी विभागातील CBU सामान्य प्रशासन विभाग आणि यशदा यांच्याशी समन्वय साधणे.

ऊ) क्षमता बांधणी आराखड्याच्या (CBP) प्रगतीचा आढावा घेणे व त्यानुषंगाने वेळोवेळी बैठका आयोजित करणे.

ऋ) विभागातील सर्व संवर्गासाठी तयार करण्यात आलेल्या CBP बाबतचा अहवाल सामान्य प्रशासन विभागास सादर करणे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०५१८१८१४२५९७०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VISHAL DATTATRAY TEKE

Digitally signed by VISHAL DATTATRAY TEKE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agriculture and Adf Dept, 2.5.4.20=B1A35A7424E4C5B594D9CB1798AC47CF07D8F7D496693EFC58A7720A5CDAFC92, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8EB1C9B88DDF43C0CCD87A95BD631AD3EE730CDB839A8115F112376617EAE32F, cn=VISHAL DATTATRAY TEKE
Date: 2026.05.18 18:15:23 +05'30'

**(विशाल टेके)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
२. मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
३. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
४. सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
५. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे
६. संचालक, वनामती, नागपूर
७. सर्व उप सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
८. कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, पुणे
९. कृषि संचालक (आत्मा), कृषि आयुक्तालय, पुणे
१०. कृषि सहसंचालक (आस्थापना), कृषि आयुक्तालय, पुणे
११. निवड नस्ती